पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, स्थापत्य मुख्यालय
क्र.स्था/लेखा/३/कावि/ १२३ /२०१६
दिं. ५ /१२/२०१६

विषय – भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणेबाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत प्रतीवर्षी विविध विकास कामे निविदा पध्दतीने ठेकेदारांना दिली जातात. निविदा अटी शर्तीनुसार भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ नुसार महापालिकेचे विकास काम करत असताना त्यावर नियुक्त केलेल्या सर्व कामगारांचे हजेरी पत्रक व किमान वेतनानुसार वेतनपत्र तयार करून त्यानुसार कामगारांना देय असलेला भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक आहे.

याबाबत कार्यालयाकडून वेळोवेळी लेखी सुचना सर्व महापालिका संबंधित कर्मचा-यांना व अधिका-यांना तसेच ठेकेदार यांना देऊनही त्याची पुर्तता होत नसल्याचे निदर्शनास येते. सदरची बाब योग्य नसुन पीएफ कायद्याचा भंग करणारी आहे. या संदर्भात मा.आयुक्त यांच्या समवेत दि.०१/१२/२०१६ रोजी भविष्य निर्वाह निधी कायद्याच्या अमंलबजावणी संदर्भात सक्त सुचना दिल्या आहेत. ज्यांच्या कडून या कायद्याची कोणत्याही स्तरावर पुर्तता केली जाणार नाही. त्यांच्यावर नियम बाह्यतेबाबत सक्त कारवाईचे आदेश दिलेले आहेत.

पीएफ कायद्याच्या अमंलबाजवणी संदर्भात खालीलप्रमाणे सक्त सुचना देण्यात येत आहेत. त्याची अमंलबाजवणी करावी.

१) ठेकेदारांकडून विकास काम करून घेत असताना त्याकामावर ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे हजेरी पत्रक व किमान वेतनानुसार वेतन पत्रक व त्यानुसार कामगारांचा देय्य असलेला भविष्य निर्वाह निधी भरणा केल्याचे भरणा चलन प्रत्येक्ष साईटवर ठेकेदारांनी उपलब्ध करून ठेवावे व त्याची तपासणी त्या कामासाठी नियुक्त केलेल्या कनिष्ठ / उपअभियंता यांना करणे बंधनकारक असेल.

२) विकास कामाचे धावते देय्य तयार करताना वर अ.क्र.१ मध्ये नमुद केलेली पुर्तता झाल्याचा दाखला संबंधित दोन्ही अभियंत्याच्या स्वाक्षरीने बिल नस्ती सोबत सादर करावा. त्याशिवाय बील तयार करण्यात येऊ नये.

३) बील छाननीकामी स्थापत्य मुख्यालयात आल्यावर तांत्रीक कक्ष व स्थापत्य लेखा विभागाकडील संबंधीत कर्मचा-यांनी पीएफ पुर्तता तपासावी पुर्तता नसेल तर बील अदायगीकामी शिफारस करू नये.

४) संबंधीत ठेकेदार यांना निविदा कामासाठी तसेच नुतनीकरणासाठी स्थापत्य विभागाचे रजिस्ट्रेशन देताना पीएफ कोड नंबर घेतलेचा दाखला तसेच पीएफ भरल्याचे अद्यावत चलने घेऊनच रजिस्ट्रेशन देण्याची कार्यवाही करावी.याबाबीची पुर्तता न करताच शिफारस केल्यास संबंधितांवर व्यक्तीशा: जबाबदारी निश्चित केली जाईल.

५) विकास कामांची निविदा कार्यवाही करत असताना निविदा लिपीक यांनी ठेकेदारांचा पात्र / अपात्रचा तक्ता तयार करताना ठेकेदारांचा पीएफ कोड नंबर व अद्यावत चलने सादर केली आहेत काय याची नोंद घेणेसाठी स्वतंत्र रखाना करावा व त्यामध्ये त्याची नोंद करावी. याची पुर्तता न कराता निविदा पात्र केल्यास संबंधितांवर व्यक्तीशा: जबाबदारी निश्चित केली जाईल. त्याचप्रमाणे

सर्व निविदा लिपीक यांनी अंतिमत: ठेकेदार यांना पीएफ पुर्तता केली नसल्यास कोणत्याही अनमात रक्कमेचा परतावा करू नयेत.

६) पीएफ कायद्यानुसार पीएफची पुर्तता होत नसल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारांच्या कामाची बिले मंजूर करू नयेत.

७) स्थापत्य विभागाकडील बीलाच्या छाननीमध्ये पीएफ पुर्तता झाल्याशिवाय बील अदायगीची शिफारस लेखाधिकारी यांनी करू नये.

भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ ची अमंलबजावणी करणेसाठी वरील सुचनांचे काटेकोरोपणे प्रत्येकांने पालन करण्याची दक्षता घ्यावी.

शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८.

प्रत – १) लेखा विभाग
२) मुख्य लेखापरिक्षक विभाग
३) कामगार कल्याण विभाग
४) मा.अतिरिक्त आयुक्त कक्ष
५) मा.आयुक्त कक्ष

माहितीसाठी सादर.